**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४**

---

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/2458
कोल्हापूर-४१६००४.
दिनांकः-२१/११/२०१९.

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुख
जिल्हा सातारा, सांगली व कोल्हापूर.

**विषयः-** मार्च-२०१९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) ची प्रमाणपत्रे (CERTIFICATES) वाटपाच्या तारखेबाबत.. ..
**संदर्भः-** या कार्यालयाचे क्र.कोविमं/शाखा माध्य-गोप./स्विकृती मार्च-२०२०/२३५९ दिनांक १४/११/२०१९ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, मार्च-२०१९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) ची **मूळ प्रमाणपत्रे (CERTIFICATES )** ही मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रांमार्फत **बुधवार दिनांक ०४ डिसेंबर २०१९** रोजी सर्व शाळांना वितरीत करण्यात येणार आहेत.

तरी सदर बाबीची सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन **बुधवार दिनांक ०४ डिसेंबर २०१९** रोजी आपल्या शाळेच्या प्रतिनिधीस संबंधित वितरण केंद्रावर **अधिकृत पत्रासह पाठवून** आपल्या शाळेची प्रमाणपत्रे ताब्यात घेण्यात यावीत.

तसेच उपरोक्त सदर्भिय पत्रान्वये प्रमाणपत्र वितरण करतेवेळी मार्च-२० परीक्षेच्या आवेदनपत्र याद्या व इतर साहीत्य घेण्याबाबत कळविले होते. **तथापि आवेदनपत्र भरण्यास व याद्या सादर करण्यास मुदतवाढ दिली असल्यामुळे आवेदनपत्र याद्या व तत्संबंधी कागदपत्रे दि.१६/१२/२०१९ रोजी निर्धारीत वितरण केंद्रांवर हस्तपोहोच जमा करण्याची नोंद घ्यावी मात्र प्रमाणपत्र स्विकारताना परीक्षक/नियामक व प्रात्यक्षिक परीक्षा शिक्षक याद्या न चुकता वितरण केंद्रावर जमा करण्यात याव्यात.**

## ** सर्व शाळाप्रमुखांसाठी महत्वाची नोंद **

माध्यमिक शालांत प्र.पत्र परीक्षा मार्च-२०२० परीक्षक/नियामक नेमणुकीसंदर्भातील व त्याचबरोबर **शास्त्र प्रात्यक्षिक परीक्षेच्या नेमणुकीसंदर्भातील स्विकृती पत्रांच्या याद्यांवर संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी घेतलेल्या** याद्या ह्या **बुधवार दिनांक ०४ डिसेंबर २०१९ रोजी हस्तपाहोच सादर करण्यात याव्यात.**

शिक्षकांच्या स्विकृतीपत्रांच्या **याद्यांअभावी मार्च-२०१९ परीक्षेची प्रमाणपत्रे दिली जाणार नाहीत याची सर्व शाळाप्रमुखांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.**

21/11

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.